आवाहन

सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकल महिलांची सामाजिक, आर्थिक व कौटुंबिक परिस्थिती, त्यांच्या गरजा, अडचणी तसेच शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ मिळण्याबाबतची माहिती संकलित करण्यासाठी एकल महिलांचे माहिती संकलन व सर्वेक्षण करण्यात येत आहे.

या सर्वेक्षणाच्या माध्यमातून महानगरपालिका कार्यक्षेत्रातील एकल महिलांची वस्तुनिष्ठ माहिती उपलब्ध करून घेऊन त्यांच्या गरजेनुसार शासकीय योजना, सामाजिक सुरक्षा, आर्थिक सक्षमीकरण, रोजगार, स्वयंरोजगार, आरोग्य, शिक्षण व इतर आवश्यक सेवा-सुविधांशी जोडण्यासाठी आवश्यक नियोजन करण्यात येणार आहे.

त्यामुळे सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका कार्यक्षेत्रातील विधवा, घटस्फोटित, परित्यक्ता, अविवाहित तसेच इतर कारणांमुळे एकट्या राहणाऱ्या महिलांनी या सर्वेक्षणामध्ये सहभागी होऊन आवश्यक माहिती उपलब्ध करून द्यावी, असे आवाहन करण्यात येत आहे.

सर्वेक्षणादरम्यान प्राप्त होणाऱ्या माहितीचा उपयोग महिलांच्या कल्याणासाठी व आवश्यक शासकीय/महानगरपालिका सेवा-सुविधांच्या नियोजनासाठी करण्यात येईल. सर्व संबंधित महिलांनी सर्वेक्षण करणाऱ्या अधिकारी/कर्मचाऱ्यांना सहकार्य करावे. तसेच महानगरपालिकेच्या वेबसाईटवर माहीती भरणेची सुविधा उपलब्ध करुन देणेत आलेली आहे.

"एकल महिलांचा सन्मान,सुरक्षितता आणि सक्षमीकरणासाठी - आपली माहिती, आपला सहभाग महत्त्वाचा!"

Sd/-
उप-आयुक्त
(महिला व बालविकास)
सांगली, मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका